सकाळ

# दिव्यांग मुलांसोबत बाल दिन साजरा

**पुणे :** दिव्यांग मुलांच्या सहवेदनांची विद्यार्थ्यांना जाणीव व्हावी, यासाठी सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी वानवडी येथील अपंग कल्याणकारी शिक्षण संस्था आणि संशोधन केंद्राला भेट दिली. शाळेमधील सहावीतील विद्यार्थ्यांनी तेथील दिव्यांग मुलांसमवेत बालदिन साजरा केला. विद्यार्थ्यांनी दिव्यांग मुलांशी संवाद साधला. या वेळी दिव्यांगांना खाऊचे वाटप करण्यात आले आणि संस्थेच्या ग्रंथालयाला पुस्तके भेट देण्यात आली. प्राचार्य अर्चना क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.




**वानवडी : बाल दिनानिमित्त दिव्यांग मुलांना सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने खाऊ व पुस्तके भेट देण्यात आली.**